(7) Dr. Rajabhau Chavan (History)
2021-2022



INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# निजामांचे मराठे सरदारातील जाधव घराणे

प्रा. डॉ. आर. ए. चव्हाण
इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड
E-mail : rchavan1972@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/08.2021-81653888/IRJHIS2108012

**प्रस्तावना :**

भारतावर अनेक परकीय सत्तेचे आक्रमण झाले, त्यामध्ये मोगल बादशहा बाबराने पाच स्वाऱ्या केल्या. इ.स. १५२६ मधील शेवटची पाचवी स्वारी आणि पानिपतचे पहिले युध्द २१ एप्रिल १५२६ बाबर आणि इब्राहिम लोदी यांच्यामध्ये झाले. या युध्दात बाबराचा विजय झाला. त्यांनी भारतात मोगल सत्तेची स्थापना केली. बाबर ते औरंगजेब बादशहा पर्यंत मोगलाची भारतात एकछत्री सत्ता होती. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहाचा मृत्यु झाला आणि मोगल साम्राज्य दुवळे झाले. मोगल सत्तेची एकछत्री सत्ता संपुष्टात आली. मोगलाचे अनेक सुभेदार, सेनापती व प्रांताधिकारी स्वतंत्र होऊ लागले. त्यात दक्षिणेत निजामाचा उदय झाला.

**निजामांची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

आसफजाही घराण्याचा संस्थापक मीर कमरूद्दीन-निजाम उल-मुल्कचा दक्षिणेशी अगदी लहानवयात संबंध आला. इ.स. १६८६-८७ मध्ये गोवळकोंड्याच्या वेढ्यात त्याचा बाप शहाबुद्दीन फिरोजजंग (गाजीउद्दीन) आणि आजा खाजा आबिद चीनकिलीचखान हे तिघेही हजर होते. निजाम उल-मुल्कला औरंगजेब बादशहाने चिनकुलीजखान हा किताब दिला.[१] इ.स. १७१३ मध्ये निजामाला दक्षिणेची सुभेदारी मिळाली. त्यानंतर गुजरातचा सुभेदार झाला. त्याने दिल्लीची सत्ता मिळविण्यासाठी खटाटोप केला हा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर त्याने बंडखोरी केली. इ.स. १७२४ पर्यंत निजाम दिल्लीच्या बादशहाचा वजिर होता. दक्षिणेच्या सुभेदारीतच स्वतंत्र हैदराबाद राज्याची स्थापना इ.स. १७२४ मध्ये भागानगर (हैदराबाद) येथे केली.[२] मीर कमरूद्दीन निजाम उल-मुल्क हा हैदराबाद राज्याचा पहिला निजाम अत्यंत धाडशी, पराक्रमी कर्तबगार, महत्वकांक्षी, मुत्सद्दी व बंडखोर प्रवृतीचा होता. हैदराबाद राज्यात खानदेश, वऱ्हाड, बीदर, विजापूर, औरंगाबाद व हैदराबाद असे ८८ जिल्ह्यांचे सहा प्रांत होते. इ.स. १७२४ ते १९४८ पर्यंतचा सव्वादोनशे वर्षाचा मोठा अवधी सात निजामाला मिळाला.[३] हैदराबाद राज्याचे एकूण क्षेत्रफळ ८२.३१३ चौ. मैल असून लोकसंख्या १६३३८५३४ होती. त्यात ७०% हिंदू १८% दलित, ११% मुस्लीम व अन्य धर्मीय १% होते. २२३६० खेडी व १३८ शहरे होती. तेलगु, कन्नड, मराठी

भाषिक असलेल्या ह्या राज्याची शासकीय भाषा उर्दू होती. राजधर्म म्हणून इस्लामाची सत्ता होती. भाकरीचे चित्र असलेला पिवळा ध्वज हा आसफजाही, निजामशाहीचा राष्ट्रध्वज होता.[४] निजामने आपला राज्यकारभार करण्यासाठी काही सरदाराची नेमणूक केली. त्यात मराठे सरदार होते. इ.स. १७२४ ते १८०० पर्यंत निजामांचे मराठ्यांशी निकटचा संबंध आला. या काळात निजामाच्या गादीवर निजाम उल-मुल्क, नासिरजंग, मुजफ्फरजंग, सलाबतजंग आणि निजाम अलीखान होते. निजामाच्या पदरी काही मराठे सरदार पूर्वीपासून म्हणजे निजामपूर्वीच्या मोगल सुभेदारांच्या पदरी होते. काही मराठे सरदार निजामाच्या राज्यातूनच त्यांच्या पदरी वाढले. मराठेशाहीतून निजामाच्या पदरी जाण्यासाठी मराठे सरदाराची रीघ लागली होती.[५] म्हणूनच निजामांचे मराठे सरदारातील जाधव घराणे हा शोधनिबंधाचा मुख्य विषय होय.

**निजामांचे मराठे सरदार :**

मराठा आणि निजाम यांच्या इतिहासात निजामातर्फे वावरणाऱ्या अनेक सरदाराची नावे मराठी कागदपत्रातून मिळतात, त्यात चंद्रसेन जाधव, रामचंद्र जाधव, सुल्तानजी निंबाळकर आणि त्याचा मुलगा हणमंतराव निंबाळकर, लक्ष्मणराव खंडागळे, विठ्ठल सुंदर, राजे रायराया, राजे रघोत्तमराव, हरबाजी पंडित (नेमवंतवाले), बालाजी केशव पळनिटकर, जानोजी निंबाळकर व शेरजंग अशी किती तरी नावे मराठ्यांच्या पत्रव्यवहारातून आलेली आहेत. त्यामध्ये निजामांचे मराठे सरदार हा भाग महत्वाचा आहे.[६]

**जाधव घराण्याचा इतिहास :**

जाधव घराणे मुळचे बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड येथील शिवपूर्व काळात आदिलशाही व निजामशाही यांच्यातील संघर्षाचा फायदा घेऊन जी घराणी महाराष्ट्रात नावारूपाला आली त्यापैकी जाधव घराणे अग्रगण्य होते. सिंदखेडच्या जाधवांचे घराणे हे देवगिरीच्या यादव घराण्यापैकी होते. जाधव हा यादव शब्दाचा अपभ्रंश होय. हे चंद्रवंशीय असून त्यांची शाखा ऋग्वेदी व गोत्र अत्री होते. या घराण्याची सुरूवात विठोजी आणि ठाकराबाई या दांपत्यापासून झाली. विठोजीचा मुलगा लखुजी, त्याचा मुलगा अचलोजी यास निजामशहाने ठार मारले. त्याचा मुलगा संताजी याचे संगोपन जिजाबाईने केले. कनकगिरीच्या लढाईत तोही मारला गेला. त्याचा मुलगा शंभुसिंग त्याचा मुलगा धनाजी त्याचा मुलगा चंद्रसेन, चंद्रसेनचा मुलगा रामचंद्र जाधव याप्रमाणे जाधव घराण्याचा इतिहास सांगता येतो.

**चंद्रसेन जाधव :**

मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामात ज्या रणविरांनी पराक्रम गाजवून मोगली फौजेच्या तोंडाला फेस आणला त्यात संताजी व धनाजी यांचे नाव अग्रक्रमाणे घ्यावे लागते. मोगल सेनानीने धनाजीच्या नावाचा इतका धसका घेतला होता की, त्यांना जळी-स्थळी, काष्टी- पाषाणी धनाजी दिसे. धनाजीच्या अतुलनीय पराक्रमामुळेच औरंगजेब बादशहाचे मराठ्यांना नेस्तनाबुत करून दख्खन विजय साकार करण्याचे मनसुबे मनातच राहिले. धनाजीचा मृत्यू इ.स. १७१० मध्ये झाला. त्यानंतर त्यांचा मुलगा चंद्रसेन जाधव यांना मराठ्यांचे सेनापतीपद देण्यात आले. छत्रपती शाहु महाराजांनी इ.स. १७१३ मध्ये बाळाजी विश्वनाथ यांना पेशवेपद दिले त्याच काळात चंद्रसेन जाधव निजामांच्या पदरी जाऊन राहिला. मराठ्यांचा सेनापती आपल्या चाकरीत आला याबद्दल निजामाला फार आनंद झाला. बेदर जिल्ह्यात हुमणाबाद, भालकी व कल्याणी याठिकाणी निजामातर्फे त्याला मोठा सरंजाम देण्यात आला. निजामांच्या दृष्टीने चंद्रसेन जाधवाची मोठी कामगिरी म्हणजे

त्याने कोल्हापूरचे करवीर संभाजी पहिले यांना निज़ामाकडे आणले ही घटना छत्रपती शाहूमहाराजांच्या राजसत्तावर मोठा कठीन प्रसंग आला होता. पण बाजीराव पहिले यांनी पालखेड येथे इ.स. १७२८ मध्ये निजामांचे सगळे डाव हाणून पाडले. त्यानंतर करवीर संभाजी पहिले यांना उरूळीकांचनच्या लढाईत पराजीत करून छत्रपती शाहूमहाराज व करवीर संभाजी पहिले यांच्यात तह घडवून आणला. करवीर संभाजी पहिले यांचे निजामाचा संबंध तोडून टाकण्यात आले.[७] इ.स. १७५१ मध्ये चंद्रसेन जाधव यांचा मृत्यू झाला.

**रामचंद्र जाधव :**

चंद्रसेन जाधव यांच्या मृत्युनंतर त्याच्या मुलाला म्हणजे रामचंद्र जाधव यांना निजामांची सरदारकी देण्यात आली. नासिरजंगच्या दक्षिणेतील मोहिमेत रामचंद्र जाधव हा त्यांच्या बरोबर होता. इ.स. १७४९-५० मध्ये सलाबतजंग गादीवर आला, दिवाण रामदास यांनी फ्रेंचांच्या मदतीने मराठ्यांवर चाल केली. (इ.स. १७५०-५२) या मोहिमेत रामचंद्र जाधव हजर राहिला नाही. परिणामी रामदास याने रामचंद्र जाधव यांचा सरजाम जप्त केला. यातून पुढे रामदासाचा खून झाला (इ.स. १७५२) खुनाच्या कारस्थानात रामचंद्र जाधवाने पाठिंबा दिला, असे तत्कालीन फारसी कागदपत्र सांगतात. इ.स. १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युध्दानंतर निजामाने मराठ्यांवर आक्रमण करून पुण्यापर्यंत मजल मारली. डिसेंबर १७६१ मध्ये रामचंद्र जाधव आपल्या सैन्यासहीत मराठ्यांना जावून मिळाला. इतकेच नव्हे त्याने निजामाचा धाकटा भाऊ मीर मोगल यालाही आपल्या कटात सामील करून घेतले. यामुळे निजामाची तारांबळ उडून त्याला मराठ्यांशी घाईघाईने तह करावा लागला. जानेवारी १७६२ रामचंद्र जाधव यांचे मराठ्यांशी न पटल्यामुळे त्यांनी त्याला दौलताबादच्या किल्ल्यामध्ये कैदेत ठेवले. तेथून कशीबशी सुटका करून तो निजामाकडे गेला आणि त्याने आपला सरंजाम परत मिळविला. निजामाने हैदर अलीवर चाल केली, पुढे त्याच्याशी संगनमत केले, नंतर त्याने इंग्रजांशी संधान बांधले. या राजकारणात रामचंद्र जाधव होता. या निमित्ताने मद्रासच्या गव्हर्नरला भेटण्यास तो गेला होता. या युध्दात त्याने परत कुचराई केली. त्यामुळे निजामाने त्याच्यावर रोष घेवून रामचंद्र जाधव यांचा सरंजाम जप्त केला. त्याला गोवळकोंड्याच्या किल्ल्यात कैदेत टाकण्यात आले. तेथेच याचा इ.स. १७७० मध्ये मृत्यू झाला. यानंतर जाधवांचे घराणे हैदराबादच्या इतिहासात नामशेष झाले.[८]

**निष्कर्ष :**

१) निजामाने आपली सत्ता टिकविण्यासाठी मराठे सरदाराची नेमणूक केली.

२) जाधव घराणे शेवटपर्यंत निजामाचे सरदार म्हणून राहिले.

३) मराठे सरदाराचा उपयोग निजामाने मराठ्यांशी राजकारण करण्यासाठी घेतला.

**सारांश :**

जाधव घराने इतिहासात उत्कृष्ट सरदार म्हणून ओळखले जातात. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दातील धनाजी जाधवची कामगिरी सुवर्णाक्षराने लिहिण्यासारखी आहे. निजाम व करवीर घराणे यांच्यामधील मैत्रिपूर्ण संबंध निर्माण करण्याचे काम चंद्रसेन जाधव यांनी केले. मराठेशाहीतून फक्त चंद्रसेन जाधव हे निजामाला जावून मिळाले. निजामाचा आपल्या मराठा सरदारावर पूर्ण विश्वास होता, असे नाही त्यांचीही स्थिती कुचंबणुकीची होती. ऐन मोहिमेत रामचंद्र जाधव मराठ्यांना जाऊन मिळाला. (इ.स. १७६१-६२) ज्यानी निंबाळकरवर नासिर जंगच्या खून प्रकरणात हेतुपूरःस्पर कुचराई

केल्याचा आरोप होता. निजामाचा मुख्य प्रधान रामदास यांच्या खुनात रामचंद्र जाधव यांचा हात होता. मराठेशाही होती तोपर्यंत निजामांच्या दरबारात मराठे सरदाराचे वजन होते. इंग्रजांनी निजामाला आपल्या रक्षणाखाली घेतल्यानंतर (इ.स. १८००) निजामाला आपल्या मराठे सरदारांबद्दल आस्था राहिली नाही आणि ती घराणी निस्तेज बनली.

संदर्भ सूची :

१) प्रा. आठवले सदाशिव, डॉ. सासवडकर प्र. ल., मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, दुसरी आवृत्ती १९८२ पृ.क्र. ३९

२) पोतदार व. ब., हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम, विद्याभारती प्रकाशन, लातूर, तृतीय आवृत्ती २००६, पृ.क्र. ३६

३) भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती १ डिसेंबर २०१२ पृ.क्र. १

४) डॉ. जोशी पी.जी., मुक्तिगाथा- मुक्तिदाता, क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड, प्रथमावृत्ती १७ सप्टेंबर २००९ पृ.क्र. १७

५) डॉ. दीक्षीतराजा (संपा), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड दुसरा, मराठी साहित्य परिषद हैदराबाद, २७ ऑगस्ट २०१० पृ.क्र. ९३४

६) पगडी सेतुमाधवराव, मराठे व निजाम उर्दू-फारसी साधने, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९६९ पृ.क्र. १४६

७) प्रा. आठवले सदाशिव व सासवडकर प्र. ल., उपरोक्त पृ.क्र. ६३

८) डॉ. दीक्षित राजा (संपा) उपरोक्त पृ.क्र. ९३५

IRJHIS